क्रमांक : १३९७८ /ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ८ ऑक्टोबर, २०२०

प्रेषक :

सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :

**विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य**

**विषय : <u>मा.सदस्यांकडून तारांकित प्रश्नांच्या सूचना स्वीकारण्याबाबत</u>**

**महोदय/महोदया,**

निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या **सोमवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२० रोजीपासून** विधान भवन, नागपूर येथे सुरु होणाऱ्या आगामी अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक व त्या दिवसाकरीता गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री तसेच प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक इत्यादी बाबी नमूद असलेला चक्रानुक्रम पत्रक भाग-दोनद्वारे सर्व मा.सदस्यांना **गुरुवार, दिनांक ८ ऑक्टोबर, २०२० रोजी** ई-मेलद्वारे पाठविण्यात आला असून या सचिवालयाच्या **www.mls.org.in** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करण्यात आला आहे. (प्रत सोबत जोडली आहे).

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार **<u>पहिल्या टप्प्यासाठी</u>** मा.सदस्यांकडून प्रत्येकी ३१ तारांकित प्रश्न सूचना **सोमवार, दिनांक १९ ऑक्टोबर, २०२० रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** QIS या संगणक प्रणालीवर ऑनलाईन (Online) पध्दतीने स्वीकारण्यात येतील.

पहिल्या टप्प्यातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट **मंगळवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०२० रोजी दुपारी १.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, पाचवा मजला, विधान भवन, मुंबई** येथे घेण्यात येईल. **संसदीय कार्य विभागाने दोन आठवडयांचा म्हणजेच सोमवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२० ते शुक्रवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२० रोजीपर्यंतचा कार्यक्रम कळविला असला तरी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार सदर कार्यक्रमाशिवाय एक आठवडयाचा जादा कार्यक्रम चक्रानुक्रमात दर्शविण्यात येत आहे.**

सोमवार, दिनांक १९ ऑक्टोबर, २०२० रोजी पहिल्या टप्प्यात प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्न सूचनांवरील कार्यवाहीबाबतचा तपशील **मंगळवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०२०** रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत या सचिवालयातील विधानपरिषद प्रश्न (ई-१) कक्षात (कक्ष क्रमांक १३०४) मा.सदस्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या त्यांच्या प्रतिनिधींना उपलब्ध करून देण्यात येईल.

कृपया याची नोंद घ्यावी अशी आपणांस विनंती आहे.

आपला,

**( प्रकाशचंद्र खोंदले )**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत माहितीसाठी :**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये,**
**विधान भवन, मुंबई-४०० ०३२.**

C:\Users\e1\Desktop\चौथे(हिवाळी) अधिवेशन, २०२०\(3) Buletin Part 2.doc